'वेलक्रो' डॉग! ५

टिटूचा पाठिराखा गोलू! ९

भूकंप : का? कसा? काय दक्षता घ्याल? १२

NIE Website

अंकासाठी संपर्क 98815 98815

सकाळ

पुणे, शुक्रवार, ४ एप्रिल २०२५ ■ पाने १२ किंमत ₹ ६

NIE NEWSPAPER IN EDUCATION

दोस्तांनो, लवकरच तुम्हाला सुट्टी लागेल. सुट्टीत अनेक जण कुठे तरी फिरायला, गावाला जातात आणि त्याची तयारी आधीच केली जाते. प्रत्येकाने आयुष्यात प्रवास करायलाच हवा. पण प्रवास करताना त्याचे उद्दिष्ट काय, याचाही विचार करायला हवा. तो केला, तर साध्या प्रवासांमधूनही उदंड आनंद मिळू शकतो आणि आपल्या अनुभवांचे विश्व आणखी मोठे होते.

प्रवास... धमाल मस्ती खास

आधी आपले गाव बघितले का?

आपण प्रवासाविषयी खूप बोलतो. परदेशी प्रवासाची स्वप्ने पाहतो. त्यात काही गैर नाही. पण असा विचार करून बघा- तुम्ही तुमचे गाव किंवा तुमचे शहर नीट बघितले आहे का?...

गार्गी आणि सूरज हे बहीण-भाऊ पुण्यात राहतात. 'सिंगापूरमध्ये जाऊन आपण 'बर्ड पॅरेडाईज' बघूया ना,' म्हणून ते सारखे आई-बाबांकडे हट्ट करत असतात. पण पुण्यात इंदापूरला उजनी जलाशयात आलेल्या फ्लेमिंगो पक्ष्यांचा फोटो जेव्हा त्यांनी वृत्तपत्रात बघितला आणि दोघांना आश्चर्यच वाटले. याचाच अर्थ आपल्या जिल्ह्यात काय बघण्यासारखे आहे, याची त्यांना माहितीच नव्हती. आता ते फ्लेमिंगो बघायला जायचा प्लॅन करताहेत.

प्रथमेश कोल्हापूरमध्ये राहतो. पण कोल्हापूर जिल्ह्यात खिद्रापूरमध्ये अतिशय सुंदर आणि जुनी बांधणी असलेले कोपेश्वर मंदिर आहे, हे त्याला अलिकडेच बाबांकडून कळले. आता तो बाबांबरोबर हे मंदिर पाहून येणार आहे.

म्हणजे आपल्याच गावात, शहरात, जिल्ह्यात अनेक पर्यटनस्थळे तुम्हाला सापडतील. या निमित्ताने तुम्हाला अशा ठिकाणांची यादी करता येईल का?... या यादीतील एखादे तरी ठिकाण तुम्ही या सुट्टीत नक्की पाहू शकाल.

फोटो काढा पण...

सध्या फोटो, व्हिडिओ, 'रील्स' आणि 'व्लॉग्ज'चा जमाना आहे. आपण कुठल्याही पर्यटनस्थळी गेलो, तरी लोक तिथे रील्स बनवताना, नाचताना, चित्रविचित्र ॲक्शन्स करूत फोटो काढताना दिसतात. प्रवासात फोटो, व्हिडिओ काढू नयेत असे नाही. पण प्रवास हा नवीन अनुभव घेण्यासाठी असतो. चांगले फोटो-व्हिडिओ मिळवण्याच्या नादात तिथल्या क्षणांचा आनंदच आपण घेत नाही. कित्येक लोक तर फोटो आणि रील्ससाठी जीव धोक्यात घालतात. तुम्ही असे करू नका! फोटो काढा, व्हिडिओ बनवा, पण मुख्य म्हणजे नवीन आणि छान छान अनुभव घ्या, कुटुंबाबरोबर धमाल करा!

प्रवासाचे प्रकार पुष्कळ

प्रवास म्हणजे फक्त मोटारीत वा कॅबमध्ये आरामात बसून केलेला प्रवास असतो का?... की भल्यामोठ्या विमानात ऐटीत बसून केलेला प्रवास म्हणजेच खरा प्रवास? प्रवासाचे अनेक मार्ग असतात. बसमधून प्रवास करता येतोच की! आणि बस म्हणजे फक्त एसी बस नाही. एसटीच्या लालपरीमध्ये बसूनसुद्धा दूरवरचा उत्तम प्रवास होतो.

आपल्या भारतात दूरवरची ठिकाणे जोडणारे लांबलचक असे रेल्वेचे जाळे आहे. रेल्वेचा प्रवास हा तर एक वेगळाच अनुभव असतो.

काही ठिकाणी पाण्यातून बोटीद्वारे दूरचा प्रवास करतात. उदा. भारतात अंदमान वा लक्षद्वीपमधील बेटांच्या दरम्यानचा प्रवास किंवा कोलकात्याजवळच्या सुंदरबन व्याघ्र प्रकल्पात बोटीने केला जाणारा प्रवास. अशा प्रवासांतही खूप मजा असते.

काही जण दुचाकीवरून लांबचे प्रवास करतात. तसा प्रवास करायला अजून तुम्ही लहान आहात. पण गावात मित्र-मित्र मिळून, आई-बाबांच्या साथीने दुचाकी वा सायकलवरून काही ठिकाणे पाहता येतील.

जिथे जाऊ, तिथले होऊन जाऊ!

आपण प्रवासाला जातो आणि मोठ्या हॉटेलांमध्ये राहतो, मोटारीतूनच फिरतो. जेवणही आलीशान रेस्टॉरंट्समध्ये करतो. यात त्या नवीन गावाबद्दल, शहराबद्दल आपल्याला जास्त माहितीच मिळत नाही. किंवा आपली माहिती लोकप्रिय स्थळांचे भोज्जे शिवण्यापुरती मर्यादित राहते. हा खरेच प्रवास आहे का?...

आपण ज्या ठिकाणी जाऊ, तिथल्या लोकांचे जीवन अनुभवायला हवे. त्यासाठी काय करता येईल?... स्थानिक सार्वजनिक बस सेवेचा वापर फिरण्यासाठी करता येईल. निरुद्देश चालत चालत भटकता येईल, स्थानिक लोक जिथे खातात तिथे जाऊन खाता येईल. अशा गोष्टींवरसुद्धा अनुक ब्लॉग्ज लिहिलेले इंटरनेटवर सापडतात. (लोकप्रिय इन्फ्लुएन्सर्सचे 'रील्स' नाही बरं का!) तुम्ही याबद्दल आई-बाबांशी बोला. तुमच्या कुटुंबाला अशा किती तरी छान स्थानिक गोष्टी करता व बघता येतील. When in Rome, do as the Romans do ही म्हण किती बरोबर आहे ना?...

पाणी : जीवनाचा आधार

पाणी, तू जीवनाचा आधार!
नदी, तलाव, समुद्राचा विस्तार
तुझ्यामुळे सृष्टीला मिळते जीवनदान
तूच तर निसर्गाचा खरा मान

तुझ्यामुळे धरती होते हिरवीगार
पशू-पक्ष्यांना मिळतो आधार
शेतकऱ्यांच्या शेतात तूच फुलवतोस पीक
तुझ्यामुळेच, तर जगतो हा प्रत्येक जीव

तुझ्यामुळे माणूस जगतो आनंदाने,
तुझ्यामुळेच तर मन भरते उत्साहाने
तूच आहेस जीवनाची खरी ऊर्जा,
तुझ्यामुळेच तर मिळते जगण्याची प्रेरणा.

पाणी, तूच तर जीवनाचा आधार!
तुझ्यामुळेच तर सुंदर होतो संसार.
तूच तर निसर्गाचा खरा मित्र,
तुझ्यामुळेच तर दिसते हे चित्र.

आध्या उफाळे, सहावी
विश्वकर्मा विद्यालय, पुणे



विविध माझी रूपे

मुलगी होणं सोपं नसतं असं अनेक लोक म्हणतात, हे खरं! लहानपणापासून प्रेमाने वाढवलेली मुलगी एक दिवस परक्याच्या घरी जाऊन राहते. वडिलांना एका 'कॉल'वर हे आणा ते आणा, असं सांगणारी मुलगी नवऱ्याला सांगताना मात्र दहा वेळा विचार करते. आईला कामात मदत करताना तोंड वाकडं करणारी मुलगी, सासरी जाऊन पाच माणसांचा स्वयंपाक अगदी सहज करते. भावाच्या खोड्या काढत, घरभर बागडणारी मुलगी मोठी झाल्यावर शंभर वेळा विचार करूनच वागते.

जरा काही झालं, तर रडून घर डोक्यावर घेणारी मुलगी नंतर कोपऱ्यात जाऊन एकटंच रडून घेते.

लग्नाआधी आई-वडिलांकडे अवखळ हट्ट करत अल्लड वागणारी मुलगी लग्न झाल्यानंतर मात्र परक्या लोकांनाही आपलंसं करते. निसर्गाने प्रत्येकात खूप शक्ती दिली आहे. त्याचप्रमाणे मुलीलाही त्याने अनेक प्रकारच्या शक्ती दिलेल्या आहेत. सर्वांवर माया करण्याची, प्रेम करण्याची शक्ती आहे, तसंच प्रसंगी ती दुर्गेचे रूपसुद्धा धारण करू शकते. त्यामुळेच लोक असं म्हणतात की, मुलीची विविध रूपे असतात. कधी ती दुर्गा होते, कधी ती लक्ष्मी होते, तर कधी ती सरस्वती होते.

घरातली मुलगी पुढे कधी सर्वांची आई होते, कधी बहीण, तर कधी वहिनी, मुलगी! देवाने हे वरदान केवळ महिलांना आणि मुलींनाच दिले आहे. त्याबद्दल त्या भगवंताचे लाख लाख धन्यवाद!

- कार्तिकी गवांदे, सहावी
सोनुबाई सखाराम महाजन शेतकी प्रशाला, मांडवगण, अहिल्यानगर

उन्हाळ्याची सुट्टी

वार्षिक परीक्षा संपल्या, की उन्हाळ्याच्या सुट्ट्या येतात. आपल्या सर्वांनाच आनंद होतो. सुट्टीत फक्त खेळायचं, टीव्ही बघायचा, मित्रांसोबत फिरायचं! असाच विचार सगळी मुले करत असतात. मात्र मी माझ्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या वेगळ्या पद्धतीने 'एन्जॉय' करते.

मी या काळात रोज शुद्धलेखन लिहिते. दहा अवघड शब्द काढते, दहा इंग्रजीची वाक्ये पाठ करते. पाढे पाठ करते. हे रोज न चुकता केलं की, त्याची एक मज्जा येत जाते. त्याचबरोबर या काळात मैदानी खेळही खेळावेत. खो खो, लंगडीमधला कावळा असे वेगवेगळे खेळ आम्ही सर्व मिळून खेळतो. मी या दिवसांमध्ये गावात विविध ठिकाणी फिरते. गावाला आमचं एक छान ग्रंथालय आहे. तिथे माझ्या मैत्रिणी व मी रोज वाचन करतो. नवीन काही तरी वेगळ्या गोष्टी शिकण्याचा प्रयत्न करतो. कधी चित्र काढून बघतो, तर कधी स्वयंपाकघरात जाऊन नवीन काही तरी शिकण्याचा प्रयत्न करतो. माझे बाबा आमच्यासाठी खूप पुस्तके वाचायला आणतात. उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही जास्तीत जास्त पुस्तकं वाचण्याचा प्रयत्न करतो.

आपण उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये वेळ वाया न घालवता काही तरी वेगळे शिकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मोबाइल-टीव्ही बघावा, पण ते अगदी थोडा वेळ! त्याबरोबरच महापुरुषांची, क्रांतिकारकांची किंवा वेगवेगळ्या गोष्टींची पुस्तके वाचावी. त्यातून आपल्याला ज्ञान मिळते. सुट्टीचा उपयोग होतो.

- सृष्टी लांडे, सातवी, हुजूरपागा कात्रज प्राथमिक शाळा, पुणे



प्रसाद खेडकर, दहावी
आत्मा मालिक माध्यमिक व उच्च माध्यमिक गुरुकुल, कोकमठाण



पृथ्वीराज चौधरी, पाचवी,
श्री दादा महाराज नाटेकर पंचकोशाधारित गुरुकुल विद्यालय, चिखली, पुणे.

पूर्वा बांगर,
पोदार इंटरनॅशनल स्कूल, सातारा

माही मोरे, सहावी
विश्‍वकर्मा विद्यालय, पुणे



अर्णवी बनसोडे,
महात्मा गांधी विद्यालय, राजगुरुनगर.

सौरीश बोधनकर,
मिटकॉन इंटरनॅशनल स्कूल, बालेवाडी, पुणे

? २) २) जीवनाचा आधार कशाला म्हटलं गेलं आहे?

✔ ४) 'दहावी फ' चित्रपटाचे दिग्दर्शन सुमित्रा भावे व सुनील सुकथनकर यांनी केले आहे.

‘कारणं काय देतोस रे?...’

सातवीच्या वर्गात मराठीचा तास सुरू होता. स्वप्नाली ताईंनी मागच्या गुरुवारीच सगळ्यांना ‘बोलीभाषा’ या विषयावर निबंध लिहायला सांगितला होता. निबंधाच्या वह्या आज वर्गात जमा करायच्या होत्या. रोमिल सोडून सगळ्या मुलांनी निबंध लिहून आणला होता. रोमिलचा नंबर पुकारल्यावर मात्र तो मान खाली घालून उभा राहिला...

अजब कारण

मराठीच्या तासाला निबंध लिहून न आणल्यानं गप्प उभ्या राहिलेल्या रोमिलला स्वप्नाली ताईंनी विचारलं, “तू का नाही लिहिलास निबंध?”

रोमिल म्हणाला, “ताई, वीकेंडला घरी पाहुणे आले होते.” त्याच्या या अजब उत्तरावर सर्व मुलंमुली हसली.

स्वप्नाली ताई म्हणाल्या, “ठीक आहे! शनिवार आणि रविवारमध्ये पाहुण्यांची सरबराई करायला तू आई-बाबांना कशी मदत केलीस ते तरी आम्हाला सांग... या दोन्ही दिवशी पाहुण्यांना चहा तूच करून दिला असशील... सगळ्यांसाठी नाश्ता आणि स्वयंपाक करायला तूच हातभार लावला असशील... घरात वाणसामान आणि भाजी तूच आणून दिली असशील... पाहुण्यांना प्रेक्षणीय स्थळं बघायलाही तूच घेऊन गेला असशील... हो ना?”

रोमिल चाचरत म्हणाला, “नाही ताई... हे तर सगळं आई-बाबांनीच केलं!”

खरं मान्य तरी करा!

ताई म्हणाल्या, “म्हणजेच ‘वीकेंडला पाहुणे आले होते,’ हे उत्तर निबंध न लिहिण्यासाठी कारण होऊ शकत नाही, हे तुझ्या लक्षात आलं का?... शिवाय पाहुणे शनिवार-रविवारी आले. त्याआधी गुरुवार आणि शुक्रवार हे दिवस निबंध लिहायला होते. म्हणजे निबंध न लिहिण्याचं खरं कारण चालढकल आणि आळशीपणा! बरोबर?”

रोमिलला काही बोलताच आलं नाही.

शेवटी ताई म्हणाल्या, “सगळ्यांनी ऐका... आपल्याकडून एखादी चूक झाली असेल, तर ती मान्य करण्यात कमीपणा का वाटतो तुम्हाला? ‘मी निबंध लिहायला कंटाळा केला,’ हे जर कारण असेल तर ते स्पष्टपणे मान्य का करत नाही? उगाच ‘पाहुणे आले होते,’ ‘बाहेर गेलो होतो’, ‘घरी लाईट गेली होती’, ‘कंपासपेटी हरवल्यामुळे लिहायला पेन-पेन्सिल सापडली नाही’, ‘लग्नाला जायचं होतं,’ वगैरे कारणं द्यायची नाहीत. ही कारणं खोटी तर आहेतच, पण अगदी हास्यास्पद आहेत. काय रोमिल?...”

रोमिल खजिल झाला आणि आजूबाजूची मुलं पुन्हा हसली.

स्वप्नाली ताई रोमिलच्या शेजारी बसलेल्या मानसला म्हणाल्या, “मानस, तू रोमिलला हसतोयस?... तू परवा गणिताचा अभ्यास केला नव्हतास, तेव्हा गणिताच्या रीताताईंना काय कारण दिलंस? ‘खेळताना पडलो ना मी, त्यामुळे पाय जरा दुखत होता!’ जशी काही पायानेच गणितं सोडवायला लागणार होती तुला!”

आता खजिल व्हायची पाळी मानसची होती. मानसने गणिताच्या ताईंना सांगितलेलं कारण ऐकून रोमिलला हसू फुटलं.

धडा

स्वप्नाली ताईंचा तास पुढे चालू झाला. परंतु रोमिल त्यांच्या आजच्या बोलण्यावर विचार करत राहिला. रोमिलचा एकही दिवस कारणं दिल्याशिवाय जायचाच नाही. कसा?...

घरातल्या सिंबा कुत्र्याला फिरवून आणण्याचं काम रोमिलचं होतं. पण रोमिल शाळेतून आल्यावर टीव्हीसमोर बस, खायला तासंतास लाव, असं करत वेळ काढायचा. आईनं आठवण करून दिली की म्हणायचा, “अगं, आता अभ्यासाची वेळ झालीय ना!” शेवटी रोमिलचा मोठा भाऊ रोहन सिंबाला फिरायला न्यायचा.

आजीला लोकरीचं क्रोशा काम करायचं होतं. तिनं रोमिलला शाळेशेजारच्या ठरलेल्या दुकानातून विशिष्ट रंगाची लोकर घेऊन ये म्हणून सांगितलं. तीन दिवस आजी आठवण करत होती. शेवटी जेव्हा तिनं चिडून विचारलं, तेव्हा रोमिल म्हणाला, “अगं आजी, काल रंगपंचमी होती ना... त्या दुकानाच्या समोरच खूप मुलं रंग खेळत होती. मलाही रंगवलं असतं त्यांनी. म्हणून मग लोकर आणायची राहिली.”

आजी म्हणाली होती, “तीन दिवस रंगपंचमीच खेळत होते का रे तिथे?...”

रोमिलला हे सगळं आठवलं आणि स्वतःची लाजच वाटली. स्वप्नाली ताईंमुळे आज रोमिल एक धडा शिकला होता. चालढकल न करता कामं वेळेत पूर्ण करण्याचा आणि मुख्य म्हणजे फालतू कारणं न देण्याचा धडा!

चालढकल टाळण्यासाठी तुम्ही ए. टी. सोर्सा यांचे ‘Time Management For Kids’ हे पुस्तक जरूर वाचा.

मेट्रोचं तिकीट मिळवा सहजपणे!

दोस्तांनो, पुणे शहरातील वाढती रहदारी, प्रदूषण आणि कोणत्याही ठिकाणी जाण्यासाठी लागणारा वेळ यापासून सुटका करून घ्यायची असेल, तर मेट्रोचा पर्याय उत्तम आहे. तुमच्यापैकी प्रत्येकानेच मेट्रोची आनंददायी, आरामदायी सफर केली असेल. अत्यंत कमी वेळात आणि परवडणाऱ्या दरात होणारा मेट्रोचा प्रवास सुखकारी आहे. त्यामुळेच आज आपण जाणून घेऊया तिकीट वितरण प्रणालीबद्दल...

दैनिक पास सुविधा

- पासची किंमत - १०० रु. (एका दिवसासाठी वैध)
- एक पूर्ण दिवस (स. ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत)
- फायदे - पासधारक दोन्ही मार्गांवर अमर्यादित मेट्रो प्रवासी सेवेचा आनंद घेऊ शकतात.
- लवचिकता - पासधारक कोणत्याही स्थानकावर कितीही वेळा प्रवेश करू शकतात किंवा बाहेर पडू शकतात.
- सूचना - पासची रक्कम परत केली जात नाही.
- सलवत - प्रवासी पाससाठी कोणतीही सवलत लागू नाही.

टीव्हीएम स्वयंचलित तिकीट वितरण प्रणाली

- स्क्रीनवर ‘खरेदी तिकीट’वर क्लिक करा.
- नकाशावर किंवा सूचीमधून गंतव्य स्थानासाठी पर्याय निवडा.
- तिकिटाचा प्रकार निवडा. उदा - सिंगल जर्नी.
- एकूण तिकिटांची संख्या निवडा (कमाल ९).
- वितरण पद्धत निवडा - व्हॉट्सॲप (डिजिटल) किंवा पेपर QR.
- QR कोड स्कॅन करा. व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये सामील व्हा. ‘हाय’ पाठवा आणि OTP इनपुट करा.
- तिकीट तपशील, रोख किंवा QR/UPI पेमेंटसाठी OTP टाका.
- UPI साठी, QR कोड स्कॅन करा आणि पेमेंट पूर्ण करा.
- व्हॉट्सॲप तिकिटांसाठी ग्रुपमध्ये लिंक मिळवा.
- कागदी तिकिटे ‘मशीन ट्रे’मधून घ्या.

‘किऑस्क’द्वारे तिकीट वितरण

- स्क्रीनवर ‘खरेदी तिकीट’वर क्लिक करा.
- नकाशावर किंवा सूचीमधून गंतव्य स्थानासाठी पर्याय निवडा.
- तिकिटाचा प्रकार निवडा. उदा - सिंगल जर्नी.
- एकूण तिकिटांची संख्या निवडा (कमाल ९).
- वितरण पद्धत निवडा - व्हॉट्सॲप (डिजिटल) किंवा पेपर QR.
- WhatsApp निवडल्यास ग्रुपमध्ये सामील होण्यासाठी QR कोड स्कॅन करा व ‘हाय’ संदेश पाठवा. OTP प्राप्त करा आणि इनपुट करा.
- स्क्रीनवर तिकीट तपशिलांची पुष्टी करा आणि पेमेंट मोड निवड.
- एकतर QR/UPI किंवा क्रेडिट/डेबिट कार्ड.
- UPI पेमेंटसाठी, प्रदर्शित केलेला QR कोड स्कॅन करा आणि तुमच्या पसंतीच्या पेमेंट ॲप्लिकेशनद्वारे व्यवहार पूर्ण करा.
- व्हॉट्सॲप तिकिटासाठी यशस्वी पेमेंट केल्यावर, व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये डिजिटल तिकिटाची लिंक प्राप्त करा.
- कागदी तिकिटासाठी, यशस्वी पेमेंट केल्यानंतर ते ‘किओस्क’च्या तिकीट वितरण ‘स्लॉट’मधून गोळा करा.

मोबाईल ॲपसाठी | मेट्रो ॲप (आयओएस) | वेळापत्रकासाठी | तिकिटांच्या दरासाठी

चावंड ऊर्फ प्रसन्नगड!

सफर गड-किल्ल्यांची

ओंकार ओक

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात असलेला छोटा चावंड किल्ला ट्रेकर्सव्यतिरिक्त इतरांना अधिक माहिती नसतो. या किल्ल्यावर जुन्या बांधकामांचे अवशेष तर आहेतच, परंतु त्याच्या आजूबाजूलाही पाहण्यासारखी काही ठिकाणं आहेत. एखाद्या अनुभवी ट्रेकरला बरोबर घेऊन संपूर्ण कुटुंबानं कराव्या अशा सहलीची ही संधी आहे.

जायचं कसं?

या किल्ल्यावर जाण्यासाठी आपल्याला सर्वांत आधी पुणे जिल्ह्यातील मंचर-नारायणगाव मार्गे जुन्नर गाठावे लागते.

जुन्नर-घाटघर या रस्त्यावर असलेल्या आपटाळे गावानंतर गडपायथ्याचं चावंड हे गाव येतं.

जुन्नर ते चावंड हे अंतर सुमारे वीस किलोमीटर आहे.

जेवणाची सोय

गडावर जाताना जेवणाचा डबा घेऊन जावा. जुन्नरमध्येही जेवणाची उत्तम व्यवस्था होते.

पाण्याची सोय

गडावर पिण्याच्या पाण्याची भरपूर टाकी आहेत

- ताशीव कातळकडा लाभलेला छोटेखानी चावंड किल्ला हा नाणेघाट परिसरातील एक संरक्षक दुर्ग मानला जातो. चावंड किल्ल्याला प्रसन्नगड, जुंड, चुंड अशीही नावं आहेत. सध्या गडाच्या संवर्धनाचे काम झाल्यामुळे चावंड गावाच्या आश्रमशाळेपासून सिमेंटच्या पायऱ्यांचा प्रशस्त मार्ग गडमाथ्यापर्यंत गेला आहे.
- या गडाला भक्कम दरवाजा असून माथ्यावर गणेशपट्टी आहे. गडमाथा तसा लहान असला तरी माथ्यावर अनेक वास्तूंचे चौथरे बघायला मिळतात. गडाच्या साधारण उत्तरेकडे पाण्याची अतिशय सुंदर अशी सात जोडटाकी आहेत. गडाच्या माथ्यावर जीर्णोद्धार केलेले चामुंडा देवीचे मंदिर असून तिच्या नावावरूनच गडाला ‘चावंड’ हे नाव देण्यात आलं आहे.
- गडाला उत्तरेकडे भक्कम तटबंदी आहे. गडावर दोन दगडी पात्रंही आहेत. गडाच्या माथ्यावरून माणिकडोह धरण, नाणेघाट परिसर, धाकोबा, भोरांड्याचे दार इत्यादी विस्तीर्ण प्रदेश दिसतो. गडाच्या ईशान्य भागात गुहा आहेत.
- चावंड किल्ल्याच्या आजूबाजूला पाहण्यासारखी भरपूर ठिकाणं आहेत. त्यात शिवनेरी किल्ला, लेण्याद्री, ओझर, हडसर किल्ला, जीवधन-नाणेघाट यांचा समावेश होतो. गडाच्या जवळच्या पूर गावाजवळ कुकडेश्वराचं प्राचीन असं सुंदर मंदिर आहे. एका दिवसात चावंड किल्ला, कुकडेश्वर आणि नाणेघाट ही एक अतिशय धमाल सहल करता येते.

३) चावंड गडाचे नाव कशावरून पडले?

१) मूळ पेशी ह्या अविभाजित असतात.

विक्रमांची अजब दुनिया

दोस्तहो, विक्रमांची दुनिया अजब आणि अतर्क्य. चला तर, विक्रमांच्या पोतडीत या वेळी काय काय आहे ते बघूया.

सर्वांत लांब 'झिप वायर सायकलिंग' ट्रॅक

अनेक जणांना सुट्टीत काही तरी 'अॅडव्हेंचर' करायचे असते. अशांना मेक्सिकोमधील 'पॅरेडाइज ऑफ कोबो सान लुकास' या ठिकाणी दोरीवर सायकलिंग करण्याचा खेळ खेळता येतो. यात एका ताणून बसवलेल्या दोरीवर सायकल बांधलेली असते. आपण या सायकलवर बसल्यावर अंगावर 'सेफ्टी गिअर' बांधून ते वर ताणून बसवलेल्या वायरला जोडायचे असते. मग आपण सुरक्षितपणे सायकल चालवू शकतो व त्याच वेळी आपल्याला थरार अनुभवायला मिळतो. मेक्सिकोमधील 'झिप वायर सायकलिंग'चे वैशिष्ट्य हे, की त्याची लांबी १११३.४८ फूट आहे. जगात ठिकठिकाणी हा खेळ खेळण्याची सोय असून त्यातील हा वायर ट्रॅक सर्वाधिक लांबीचा आहे. समुद्राशेजारी वाळूत उभारलेल्या दोन टॉवर्सच्या मध्ये वायरवर सायकलिंग करायला किती मजा येत असेल ना?...

सर्वाधिक ठोकळ्यांचा २-डी पिरॅमिड

आयताकृती ठोकळे एकापुढे एक वा एकावर एक कलात्मकरीत्या रचून आकृत्या बनवल्या जातात आणि केवळ एका बाजूच्या एकाच ठोकळ्याला धक्का लावताच ती संपूर्ण आकृती क्रमाक्रमाने ढासळत जाते. या खेळाला 'डॉमिनो टॉपलिंग' किंवा 'डॉमिनो चेन रिॲक्शन' असे म्हणतात. ठोकळे योग्य प्रकारे रचले, तरच ती आकृती नंतर आपल्याला अपेक्षित पद्धतीने मोडत/ ढासळत जाते. हे दृश्य अतिशय छान दिसते. या खेळासाठी सहभागी मंडळी त्यांच्याही नकळत विज्ञानाचा भरपूर वापर करत असतात. कोण मोठ्यात मोठा २-डी किंवा ३-डी डॉमिनो पिरॅमिड बनवतो आणि 'डॉमिनो चेन रिॲक्शन' पद्धतीने तो मोडून दाखवतो, यात लोकांची चढाओढ लागते. अमेरिकेत मिशिगनमध्ये ९ उत्साही तरुणांनी तब्बल ८१२२ ठोकळे वापरून एक २-डी पिरॅमिड बनवला आणि तो पद्धतशीरमध्ये मोडून दाखवला. त्यांचा हा विक्रम 'गिनिज वर्ल्ड रेकॉर्डस्'मध्ये नोंदला गेला.

११० फूट लांबीची 'ब्लू व्हेल'

देवमासा अर्थात 'व्हेल' हा जगातील सर्वांत मोठा मासा असल्या तुम्ही ऐकले असेल. पूर्ण वाढलेल्या 'ब्लू व्हेल' माशाची लांबी सर्वसाधारणपणे ६५ ते १०० फूट असू शकते. तसेच त्यांचे वजन १६० ते १७६ टन असते. पण यापेक्षाही लांब आणि वजनदार देवमाशांची आजवर ठिकठिकाणी नोंद झाली आहे. अंटार्क्टिक महासागराच्या काठावर १९० टन वजन असलेली एक ब्लू व्हेल मादी १९४७ मध्ये सापडली होती. तर १९०९ मध्ये दक्षिण जॉर्जियामध्ये ११० फूट लांबीची ब्लू व्हेल मादी सापडली होती. देवमाशांना वाचता येत नसल्याने त्यांचा हा विक्रमी इतिहास मात्र त्यांना माहिती नसेल!

इलेक्ट्रिक कारमधून जगभ्रमण

युनायटेड किंग्डममधील ख्रिस आणि ज्युली रामसे या जोडप्याने आपल्या इलेक्ट्रिक कारमधून उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत प्रवास केला आहे. ३३,७९६ किलोमीटरचा हा प्रवास त्यांनी ९ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण केला. यात त्यांनी १४ देश पालथे घातले. कमीत कमी प्रदूषण करणाऱ्या इलेक्ट्रिक वाहनांनीही इतक्या लांबवरचे प्रवास करता येतात, हे ख्रिस व ज्युली यांनी अधोरेखित केले. त्यासाठी त्यांनी 'Nissan Ariya' ही गाडी वापरली होती. असे विक्रम करायला काटेकोर 'प्लॅनिंग' करावे लागते. ख्रिस आणि ज्युली गेली ६ वर्षे हा प्रवास कसा यशस्वी होईल, यासाठी आखणी करत होते, सराव करत होते, कारण त्यांना -४५ अंश सेल्सियस इतक्या कमी तापमानातही प्रवास करावा लागणार होता. बर्फ-पाण्याच्या रस्त्यांवर गाडी चालवण्याबरोबरच त्यांना अनेक ठिकाणी निसर्गात तंबू ठोकून राहावे लागले.

स्क्रीन टाइम

दहावी फ



कशासाठी बघायचा चित्रपट?

- माणसाला केवळ स्वत:चाच विचार करण्याची सवय असते. पण जगात आपल्यापेक्षा वेगळे राहणीमान असलेले खूप लोक असतात. त्यांच्या अडचणीही वेगळ्या असतात आणि त्या आपल्या सहसा लक्षात येत नाहीत.
- हा चित्रपट आपल्याला इतरांच्या दृष्टिकोनातून विचार करायला शिकवतो.
- कितीही संकटे असली, तरी जिद्द व कष्टाने यश मिळवण्याची प्रेरणा हा चित्रपट देतो.

विचार करायला लावणारी गोष्ट

मित्रमैत्रिणींनो, दहावीचे वर्ष आपल्याकडे फार महत्त्वाचे मानले जाते. तुमच्यापैकी जे विद्यार्थी उन्हाळी सुट्टीनंतर सातवीतून आठवीत जातील वा नववीतून दहावीत जातील, त्यांच्यावर 'उंडारणे, खेळणे बंद करा, अभ्यास करा,' अशा सूचनांचा भडिमार व्हायला सुरूवात झाली असेल. ज्यांना गुण कमी मिळत असतील, त्यांना आतापासूनच 'टेन्शन' यायला लागेल. अशा 'टीनएजर' विद्यार्थ्यांना स्वत:ला सिद्ध करण्याची प्रेरणा देणारा एक चांगला मराठी चित्रपट आहे 'दहावी फ'.

चित्रपटाची गोष्ट

दिवाळीच्या सुट्टीनंतर शाळा भरते आणि पहिल्याच दिवशी 'दहावी फ'च्या 'ढ' मुलांना शिक्षकांकडून चांगला 'डोस' मिळतो. या वर्गात सगळ्या विषयांत पास झालेली मुले फक्त तीनच असतात. 'दहावी फ'मधील पुष्कळ मुले काळ्या नाल्याजवळच्या वस्तीत राहणारी असतात आणि गरिबीमुळे त्यांच्यापैकी काहींना बाहेर काम करावे लागत असते. 'मवाली' अशी प्रतिमा झालेले हे विद्यार्थी भांडणे-मारामाऱ्या, परीक्षेत नापास होणे आणि शिक्षा या चक्रात अडकलेली असतात. या सगळ्याने चिडलेली ही मुले रात्री शाळेत घुसून तोडफोड करतात, नकाशे चोरतात. पोलिसांना शाळेत बोलवले जाते. गणित व विज्ञान शिकवणाऱ्या देशमुख सरांना समजते की ही करतूत 'दहावी फ'चीच आहे, पण ते मुलांवर कायदेशीर कारवाई होण्यापासून वाचवतात. शाळेतर्फे 'दहावी फ'ला शाळेत यायला बंदी केली जाते आणि त्यांच्या घरी पत्रे पाठवली जातात. मुले देशमुख सरांना भेटून आपली चूक मान्य करतात. या मुलांनी उपकरणांच्या प्राथमिक दुरुस्त्या करायला शिकावे आणि प्रयोगशाळेतील वायरिंग दुरुस्त करून द्यावे असे ठरते. तरीही काही दंड भरावाच लागणार असतो. नुकसान भरून दिल्याशिवाय या मुलांचा वर्ग सुरू होणार नसल्याने त्यांना अभ्यास घरी करावा लागणार असतो. देशमुख सर मुलांच्या अभ्यासाची जबाबदारी घेतात. परंतु हे सोपे नक्कीच नसते. मुलांना सुधारायचे, हा देशमुख सरांचा निश्चय पूर्णत्वास जातो का? 'दहावी फ'च्या मुलांच्या मागचे नष्टचर्य संपते का? त्यांना शाळेत प्रतिष्ठा मिळते का? या प्रश्नांची उत्तरे या चित्रपटात आहेत.

चित्रपटाची वैशिष्ट्ये

या चित्रपटाचे दिग्दर्शन सुमित्रा भावे व सुनील सुकथनकर यांनी केले आहे. 'टीनएजर' विद्यार्थ्यांबरोबरच पालक व शिक्षकांनीही तो आवर्जून पहावा असा आहे. शिक्षणाचा खरा उद्देश काय असावा? गरीब विद्यार्थ्यांचा कसा वेगळा विचार करता येईल? याबद्दल हा चित्रपट विचारप्रवण करतो. तो यूट्यूब व ॲमेझॉनवर उपलब्ध आहे.

माय रेसिपी

दोस्तांनो, उन्हाळ्याच्या वातावरणात अगदी योग्य अशी एक थंडपेयाची रेसिपी आज आपण पाहूया. हे पेय केरळमध्ये मलबार भागात करतात. याचे नाव आहे- 'अवल मिल्क'. 'अवल' म्हणजे पोहे. हा दूध-पोह्यांचा केरळी अवतार आहे! हा सोपा व चवदार पदार्थ तुम्हाला नक्की मजेचा वाटेल.

प्रयोग करा

'अवल मिल्क'मध्ये आपण साखरेबरोबर एखादी हेल्थ/ न्युट्रिशन ड्रिंक पावडरही घालू शकतो. त्याने वेगळी चव येईल.

हे लक्षात ठेवा

- या रेसिपीसाठी सोनकेळी, वेलची केळी वा 'येल्लाकी बनाना' या नावाची केळी घ्यावीत. ती चविष्ट असतात.
- पोहे भाजताना आई-बाबा शेजारी असलेले बरे.

मजेदार 'अवल मिल्क'

साहित्य

थंड दूध (तापवून गार करून फ्रिजमध्ये ठेवलेले दूध घ्या.), २ पिकलेली लहान केळी, १ कप जाड पोहे (केरळमध्ये लाल/ ब्राऊन पोहे वापरले जातात.), पाव कप भाजलेले शेंगदाणे, चवीनुसार साखर, तुम्हाला आवडणारा सुकामेवा उदा. बेदाणे/ मनुका, बिया काढलेला खजूर, काजू-बदामाचे काप, टूटीफ्रूटी, चेरी इ.

कृती

'अवल मिल्क'साठी प्रथम मोठ्या आकाराचे काचेचे ग्लास धुऊन, पुसून 'रेडी' ठेवा. गॅसवर कढई गरम करायला ठेवा आणि त्यात मंद आचेवर जाड पोहे कुरकुरीत भाजून घ्या. भांड्यात काढून ठेवा. केळी हाताने वा काट्या चमच्याने कुस्करा. भाजलेल्या शेंगदाण्यांची साले काढून घ्या. ही तयारी झाल्यावर आपण 'अवल मिल्क'चे ग्लास तयार करूया. एका ग्लासमध्ये प्रथम २-३ चमचे कुस्करलेले केळे घाला. त्यावर २ चमचे शेंगदाणे घाला. त्यावर २-३ चमचे भाजलेले पोहे घाला. १ चमचा साखर घाला. तुम्हाला आवडणारा सुकामेवा घाला. आता ग्लासमध्ये हे सर्व थर भरेपर्यंत थंड दूध ओता. हेच सर्व थर आपल्याला एकावर एक पुन्हा लावायचे आहेत. पुन्हा सर्व थर भरेपर्यंत थंड दूध ओता. सगळ्यांत वर परत भाजलेले पोहे, सुकामेवा, टूटीफ्रूटी घाला. झाले 'अवल मिल्क' तयार. हे अवल मिल्क चमच्याने वरून खालपर्यंत ढवळतात आणि खातात. मोठा ग्लास नसेल, तर अवल मिल्क बाऊलमध्ये थर लावूनही करता येईल.

‘वेलक्रो’ डॉग!

काही वेळा पाळीव कुत्रे अगदी बालवाडीतल्या मुलांसारखे वागतात! लाड करावेत म्हणून हट्ट करतात आणि शिस्त लावायचा प्रयत्न केला की ऐकत नाहीत आणि रुसून बसतात! पण काही वेळा कुत्रे मालकांच्या फारच मागे मागे करतात. त्यांना जराही एकटं सोडत नाहीत. याला इंग्लिशमध्ये नाव आहे ‘वेलक्रो डॉग’!

पेटोपिया

कुत्र्यांनाही ताण येऊ शकतो!

मित्रांनो, तुम्ही मोठ्या माणसांना बोलताना ऐकलं असेल, की हल्ली अनेक माणसांना ताणतणाव असतात. तसाच ताण अनेक कारणांनी कुत्र्यांनाही येऊ शकतो. कुत्र्यांना कशामुळे ताण आला असेल, भीती वा चिंता वाटत असेल, तर ते सारखे मालकाच्या बरोबर राहतात.

कुत्रा आजारी आहे का?

कुत्रा आजारी असेल, तर त्यांना सारखी मालकाची सोबत हवीशी वाटते. कुत्रा जर म्हातारा झाला असेल, तरीही त्यांना सारखं जवळ कुणीतरी लागतं.

खाऊ देऊन लाड

कुत्रा जवळ आला, त्याने हात लावू दिला, की आपण त्यांच्याशी गोड-गोड बोलतो. ते आपल्या मागून आले की त्यांचे लाड करून खाऊ देतो. यामुळे कुत्र्यांचा असा समज होऊ शकतो, की सारखे मालकाच्या मागे मागेच राहिले पाहिजे, म्हणजे लाड होतील!

पिल्लांना सारखे ‘पेट’ करणे

घरात कुत्र्याचं पिल्लू आणलं की आपल्याला प्रचंड आनंद होतो. मग आपण त्याचे अतिलाड करायला लागतो. त्यांना सारखं मांडीवर घेऊन बसतो, सतत त्यांना खेळवतो, हात लावतो (‘पेट’ करतो). पिल्लू आपल्याजवळ आलं की खाऊ देतो. आपल्या अशा वागण्याने या पिलांना सुटं-सुटं खेळण्याची सवयच लागत नाही. एकटं राहणं त्यांना असुरक्षित वाटू लागतं. मग ते सारखे मालकाबरोबरच राहतात.

‘चिपकू’ वर्तन

मागील अंकात आपण कुत्रा आणि मांजर यांच्यातला फरक पाहिला होता. त्यात आपल्याला हे समजलं, की कुत्र्याला आपली सोबत हवीहवीशी वाटते आणि आपल्या जवळपास राहायलाही आवडतं. पण मालकाच्या जवळपास राहणं आणि सारखं मागे-मागे फिरणं, यात फरक आहे. शाळेच्या बुटांना लेस बांधण्याऐवजी पुष्कळदा ‘वेलक्रो’ दिलेलं असतं. वेलक्रोची एक बाजू दुसऱ्या बाजूवर ठेवली की ती चिकटते आणि आपण झटपट बूट घालून तयार! तसे हे कुत्रे जणू ‘वेलक्रो’सारखे आपल्या मालकांना चिकटलेले असतात. त्यांची पाठ सोडत नाहीत! कुत्रा पाळणारे काही लोक सांगतात, की “माझा कुत्रा ना, जराही एकटा राहात नाही! सारखा मागे मागे येतो. जरा एकटं सोडलं, की भुंकतो आणि रडतो. मी बाथरूमला जायला निघालो, तरी याला मागे मागे यायचं असतं!” कुत्र्याच्या या ‘वेलक्रो’ वर्तनाकडे सुरूवातीला कौतुकानं, लाडानं पाहिलं जातं, पण नंतर मालक वैतागतात, चिडतात. आपण तसं न करता कुत्र्यांचं हे वागणं समजून घेऊया.

दिनक्रमात काही बदल झालाय का?

आपण जेव्हा घर बदलतो तेव्हा, किंवा इतर काही कारणांमुळेही कुत्र्यांच्या सरावाच्या दैनंदिनीत मोठे बदल होऊ शकतात. आपल्याला ते पटकन जाणवले नाहीत, तरी कुत्र्यांना ते त्रासदायक वाटतात. मग ते मालकाला चिकटून राहतात.

मी काय करू?

तुमचा पाळीव कुत्रा जर ‘वेलक्रो डॉग’सारखा सतत तुम्हाला चिकटून राहात असेल, तर प्राण्यांच्या डॉक्टरांचा (‘व्हेट’) सल्ला घ्यायला हवा. ते कुत्र्याला काही त्रास होतोय का, ते शोधून काढतील आणि त्याला सुटं-सुटं राहणं कसं शिकवायचं, ते तुम्हाला सांगतील.

कुत्र्यासाठी पोषक वातावरण हवं!

- पाळीव कुत्र्याला घरात त्याची अशी एक आरामदायक जागा हवी.
- रोज कुत्र्याला त्याच्या प्रजातीनुसार योग्य तितका व्यायाम करायला, फिरायला घेऊन जायला हवं.
- कुत्र्यांसाठी काही खेळणी मिळतात, ती त्यांच्या बुद्धीला चालना देतात. ती त्यांना खेळायला द्यायला हवीत.

खेळ खेळूयात

अदला-बदल!

डॉ. अमृता देशपांडे-देशमुख

दोस्तांनो, आपण आज आणखी एका नवीन खेळाची माहिती घेणार आहोत. चपळता आणि समन्वय या कौशल्यांचा हा खेळ आहे. यासाठी किमान ५ खेळाडू लागतात. त्याबरोबर एक मध्यम आकाराचा चेंडू लागणार आहे.

कृती

- चौकोनी मैदान आखून घ्यावे. प्रत्येक कोनावर गोल आखून त्यात खेळाडू उभा करावा.
- चौकोनाच्या मध्ये एक गोल आखून त्यात एक खेळाडू उभा करावा.
- सुरू करताना मधल्या खेळाडूने चेंडू एका खेळाडूकडे टाकावा आणि तो चेंडू त्या खेळाडूने त्याच्या समोरच्या खेळाडूकडे टाकावा आणि त्याच वेळी दुसऱ्या बाजूच्या खेळाडूंनी जागेची अदलाबदल करावी.
- हे करत असताना मधल्या खेळाडूने पटकन कोणतीही रिकामी जागा पकडण्याचा प्रयत्न करावा. हे चेंडू झेलला जाण्यापूर्वीच करायचे आहे.
- ज्या खेळाडूची जागा घेतली गेली, तो मधल्या गोलात उभा राहतो.

कौशल्ये

- या खेळात वेग, चपळता आणि समन्वय या कौशल्यांचा कस लागतो. एकाग्रता वाढते.
- हा खेळ क्रिकेट, बेसबॉल, हँडबॉल या खेळांसाठी पूरक आहे.

अॅप माझे

सी अॅण्ड स्काय
(संकेतस्थळ)

दोस्तांनो, समुद्र आणि आकाश दोन्ही अथांग आहे. या दोन्हीच्या पोटात विज्ञानाची इतकी आश्चर्ये दडलेली आहेत, की एकदा जाणून घ्यायला सुरूवात केल्यावर उत्सुकता वाढतच जाते. समुद्र आणि आकाशाची लहान मुलांच्या दृष्टिकोनातून माहिती देणारे एक संकेतस्थळ आहे ‘http://www.seasky.org/’.

महासागर ते अंतराळ

कोणासाठी?

- समुद्र व अंतराळ यांबद्दल कुतुहल असलेल्या कुणासाठीही.

संकेतस्थळावर काय काय?

- समुद्र व आकाशाबद्दलचे काही मनोरंजक विषय व संकल्पना मुख्य पानावर वाचता येतात. उदा. - सुंदर व रंगीबेरंगी दिसणाऱ्या प्रवाळांवरील समुद्री जीवन कसे असते?
- खोल समुद्रात कोणते जीव आढळतात. या वेगवेगळ्या प्राण्यांची चित्रे देण्यात आली असून चित्रावर ‘क्लिक’ करून त्यांची माहिती वाचता येते.
- आकाश विभागात खगोलशास्त्रातील विविध व्याख्या दिलेल्या आहेत.
- सौरमाला व त्यातील ग्रहताऱ्यांची माहिती आहे.
- या संकेतस्थळावरील माहिती इंग्लिशमध्ये आहे. परंतु अडणारे शब्द शिक्षक वा पालकांना विचारून तुम्ही ती वाचू शकाल.
- संकल्पना समजून घेण्यासाठी या संकेतस्थळावर चांगली माहिती आहे; परंतु अगदी ताज्या घडामोडींच्या बातम्यांसाठी इतर संकेतस्थळेही बघावी लागतील.

हे नक्की वाचा

- अमेरिकेतील फ्लोरिडा इथल्या जे. डी. नाइट या व्यक्तीने चालवलेले हे खासगी संकेतस्थळ आहे. नाइट ग्राफिक व वेब डिझायनर आहेत. त्यांना समुद्र आणि अंतराळाविषयी लहानपणापासून कुतुहल होते. त्यांनी मोठेपणी हा उपक्रम केला.
- तुम्हीही शिक्षक-पालकांची मदत घेऊन या उन्हाळ्याच्या सुट्टीत तुमच्या आवडीच्या विषयावर असा अभ्यासपूर्ण आणि तितकाच मजेदार ब्लॉग लिहू शकाल का?



DONATING TO CHARITY

Alchemize

Donating Clothes to a Local NGO

Person 1 : I've been cleaning out my closet. Do you think they would accept these old clothes?

Person 2 : Definitely! There's an NGO in the neighborhood that collects clothes for those in need. I donated some last week.

Person 1 : That's great to know. I have a mix of old sarees and shirts. It feels good to know they'll be put to use.

Person 2 : Absolutely! You can also donate blankets or school supplies, especially now with Diwali approaching.

Person 1 : I'll sort through everything and drop it off tomorrow. Thank you for the info!

Donating Money During a Religious Festival

Person 1: Have you heard about the charity event organized by the temple this year?

Person 2: Yes, I did! They're collecting donations to help the families of farmers who have been affected by the floods.

Person 1: That's such a good cause. I think I'll contribute a little from my savings.

Person 2: It's a wonderful way to give back. Every bit helps. I've already donated, and I plan to help with their food distribution next week.

Person 1: I'll donate in the temple's donation box and also offer some food items. It feels right during this time of year.

Organizing a Charity Drive

Person 1: We've been discussing how we can support the local orphanage. I was thinking of organizing a drive.

Person 2: That's a wonderful idea! We can collect clothes, toys, and even some stationery for the kids.

Person 1: Yes! I'll create a WhatsApp group with the neighbors, and we can have a donation day at the community hall.

Person 2: Count me in. I'll also reach out to my office for any supplies they might want to donate.

Person 1: Perfect! Let's try to gather as much as we can before the weekend. The kids will be so happy.

Donating Food

Person 1: I've been cooking extra food today. I think I'll send some to the nearby shelter.

Person 2: That's such a kind gesture. They're always in need of food, especially during the winter.

Person 1: Exactly! I've packed some rice, dal, and vegetables. They'll really appreciate it.

Person 2: If you need any help, I can come with you. It's a small effort that makes a big difference.

Person 1: Thank you! Let's go together. The more, the merrier.

ESSAY WRITING

Explaining Ideas Clearly

Last time, we learned how to write a narrative essay. This time, we will explore how to write an expository essay, where your goal is to explain an idea or provide information in a clear and organized way.

An expository essay is meant to explain a topic, present facts, and give examples without the writer''s opinion or bias. It's often used to explain how something works, give instructions, or explore a topic in depth. The key to writing a successful expository essay is being clear, precise, and factual.

Steps to Write an Expository Essay:

1. Choose a Topic: Pick a subject you know well and can explain easily, such as a hobby, an event, or a process.

2. Research Your Topic: Gather facts, details, and examples to support your explanations.

3. Write a Strong Introduction: Introduce the topic and provide a brief overview of what you will explain.

4. Develop Clear Body Paragraphs: Each paragraph should focus on a different aspect of the topic. Use facts and examples to support your ideas.

5. Conclude with a Summary: In your conclusion, briefly summarize the key points of your essay and restate the importance of the topic.

Example Topics:

How to Plant a Tree: Explain the steps involved in planting a tree, from choosing a location to caring for it.

The Importance of Recycling: Describe why recycling is important and how it benefits the environment.

Sample Sentence:

"Recycling helps reduce waste in landfills, conserves natural resources, and lowers pollution, making it an essential part of protecting our planet."

An expository essay helps the reader understand a topic by breaking it down into easy-to-understand facts and explanations!

Alphabet Express

शीतल करंदीकर

दोस्तांनो, आज 'Alphabet Express' मध्ये R ने संगळ्यांसोबत आपला प्रवास सुरू केला आहे. R ला मित्र बनवायला आजिबात वेळ लागत नाही. सर्वांशी ओळख करून घेऊन त्याने आता त्याची शिदोरी उघडून सर्वांसमोर एकएक शब्द बाहेर काढायला सुरुवात केली आहे. पाहू या आपणही त्याने कायकाय आणलंय ते! चला तर मग.

R शी दोस्ती!

१) rapid = (उच्चार : रॅपिड) = जलद = She drove home at a rapid speed.

२) regular = (रेग्युलर) = नेहमीचा = He is a regular customer of this shop.

३) rectify = (रेक्टीफाय) = दुरुस्ती करणे = I will try to rectify my mistake.

४) restore = (रिस्टोर) = पुनःप्रस्थापित करणे = Please restore the structure as soon as you can.

५) retaliate = (रीटॅलिएट) = प्रत्युत्तर देणे = The enemy retaliated with full force.

६) rebel = (रिबेल) = बंड करणे = The citizens of India rebelled against foreign rule.

७) righteous = (राइटियस) = न्यायी, नीतिमान King Harishchandra was known to be a righteous king.

८) remedy = (रेमेडी) = इलाज = Is there any remedy for this illness?

९) rustic = (रस्टीक) = जुन्या पद्धतीचा = She designed her house in a rustic fashion.

१०) reverse = (रिवर्स) = मागे घेणे = He found it difficult to reverse his statement.

११) rugged = (रग्गेड) = खडबडीत = The rugged road up the hill, was tough to walk on.

१२) remorse = (रिमोर्स) = पश्चात्ताप = She cried bitterly in remorse.

१३) rack one's brains = वाक्प्रचार (रॅक यॉर ब्रेन्स) = मेंदूला ताण देणे = You will have to rack your brains to find a solution for this.

१४) ray of hope = वाक्प्रचार (रे ऑफ होप) = आशेचा किरण = I see a ray of hope in your eyes.

१५) rags to riches = वाक्प्रचार (रॅग्ज टू रीचेस) = बिकट गरीबीतून कष्टाने वर येऊन श्रीमंत झालेला = His journey from rags to riches is truly inspirational.

१६) rapport = (रॅपो) = भावबंध = They soon built a strong rapport with their neighbours.

१७) rampant = (रॅमपन्ट) = मोठ्या प्रमाणात = The tendency to break traffic rules is rampant on the roads these days.

१८) reciprocate = (रेसीप्रोकेट) = परतफेड करणे = He reciprocated his brother's feelings.

१९) rejuvenate = (रीज्युविनेट) = पुनरुज्जीवित करणे = The treatment completely rejuvenated her skin.

२०) relentless = (रिलेन्टलेस) = अथक = She has taken relentless efforts for her children's upbringing.

तर अशी ही सुरेख मेजवानी आज R सगळ्यांसाठी घेऊन आला होता. आजच्या गंमतपाठाच्या निमित्ताने R पासून सुरू होणाऱ्या आणखी काही शब्दांची आपण या अंगतपंगतीमध्ये भर घालायची आहे.



STORY

THE MAGIC NEEDLE

Siddhi Sathe

In the small village of Brindavan, there lived a young girl named Meera. She loved to sew and often spent her afternoons stitching clothes for her family. But one day, while sewing a beautiful new dress for her younger sister, she broke her needle. Meera tried everything to fix it, but the needle was beyond repair. She couldn't finish the dress now.

Feeling disheartened, she sat by her window, staring at the broken needle. As she sighed, an old woman appeared on the path leading to her house. "Why the sad face, child?" the old woman asked kindly.

Meera explained her troubles and how the broken needle had ruined her plans. The woman smiled and handed Meera a small, shimmering needle. "This is a magic needle," she said, "Use it only when you truly need it, and it will never fail you."

Meera was curious but wasn't sure if she believed in magic. She carefully took the needle and thanked the old woman. That night, when she tried to finish the dress, she decided to try the magic needle. To her surprise, as soon as the needle touched the fabric, it worked beautifully, sewing the seams with perfect precision.

The next day, Meera discovered that the dress had magically grown into something even more beautiful than she had imagined. It sparkled with a glow, and the stitches were flawless.

Meera wanted to show her family her masterpiece, but when she reached the market, she saw many people admiring the dress, and everyone wanted one just like it.

Meera realized that with the magic needle, she could do more than she ever thought. But instead of becoming greedy, she decided to use the magic to help others in need.

Her simple act of kindness spread, and soon, the entire village was stitching their dreams together with Meera's magical needle.

English

Blue Jackal



One day, a jackal was very hungry. He saw a village nearby and went there to find food.

But some dogs saw him and started chasing him. The jackal ran as fast as he could!

He jumped into a washerman's house and hid inside a big drum of blue dye.

When he climbed out, his fur was all blue! The forest animals were scared of him.

GRAMMAR BITE

Malapropisms

A malapropism is the use of a word that is incorrect in a particular context, but sounds similar to the intended word. It often leads to humorous or confusing situations and is a fun aspect of language!

Examples :

1. "He is the pineapple of politeness."
Intended: "Pinnacle." The mix-up makes the sentence funny.

2. "We cannot let terrorists and rogue nations thumb our nation."
Intended : "Thump." The mix-up adds an amusing twist to the phrase.

3. "She is the best dancer in the world; she has so much euphoria!"
Intended : "Eloquence." The mistake leads to a funny misunderstanding of what was meant.



4. "We will burn that bridge when we get to it."
Intended : "Cross." A humorous confusion of idioms!

Malapropisms can be funny and are often used in literature, comedy, or everyday conversation to add humor or highlight a character''s lack of language knowledge.

संस्कार

आनंददायी शनिवार

सुभाषित

चलन्तु गिरयः कामं युगान्तपवनाहताः ।
कृच्छ्रेऽपि न चलत्येव धीराणां निश्चलं मनः ।।

प्रलयकाळाच्या वाऱ्यांमुळे पर्वत डळमळतात, परंतु धैर्यवान व्यक्तींचे मन कोणत्याही संकटात डळमळत नाही.

सुविचार

शब्द हे आपले विचार प्रतिबिंब असते. त्यामुळे चांगला विचार करा.

गीता श्लोक

कैर्लिङ्गैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो ।
किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ॥

अर्जुन म्हणाला, श्रीकृष्णा, सत्व, रज, तम या तीन गुणांच्या पलीकडे गेलेला जीवनमुक्त कोणत्या लक्षणांनी युक्त असतो? त्याचे आचरण कसे असते? तो तीन गुणांना ओलांडून कसे जातो?

दिनविशेष

५ एप्रिल

२००२ : महाराष्ट्र सरकारचा व्ही. शांताराम पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते चंद्रकांत गोखले यांना जाहीर.

६ एप्रिल

२००२ : 'लगान' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपट व दिग्दर्शनासह 'आयएएफए'चे सात पुरस्कार जाहीर.

७ एप्रिल

२०१३ : जमिनीवरून जमिनीवर मारा करू शकणाऱ्या अण्वस्त्रवाहू 'अग्नी-२' क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी.

बोधकथा

प्रशांत सरुडकर

प्रयत्नवाद

अश्मक देशातील देवभूती हा राजा अतिशय प्रजाहितदक्ष होता. मोहिनीदेवी हे त्यांच्या पत्नीचे नाव. सर्व काही आनंदात असताना अचानक शेजारच्या राज्यातील राजा जितेंद्रियने अश्मक राज्यावर आक्रमण केले. देवभूती गाफील असल्याने त्याचा पराभव झाला. त्याला तह करावा लागला आणि देवभूती राजा जितेंद्रियचा अंकित झाला. स्वतंत्र राज्य म्हणून त्याचे अस्तित्व संपून गेले. राज्यकारभारावरून त्याचे मन उडाले. तो दैनंदिन कामकाजात लक्ष देईना. आपले प्रजाजन, राजपरिवार या सर्वांकडे त्याने दुर्लक्ष केले. आळसात त्याचा दिवस जाऊ लागला.

एके दिवशी राणी आपल्या पतीकडे गेली व म्हणाली, ''राजन, जनतेच्या हिताचे रक्षण करणे राजपुरुषाचे कर्तव्य आहे. तुम्ही शांत बसलेला आहात. कोणतेही कर्तृत्व दाखवत नाही. राज्यकारभारात लक्ष देत नाही, हे योग्य नाही. या राज्याला वैभवशाली परंपरा लाभलीय. पूर्वजांचा अवमान होणार नाही याची दक्षता राजाने घेतली पाहिजे.'' आपल्या पत्नीचे हे शब्द ऐकताच देवभूती राजा तिला म्हणाला, ''मोहिनी, युद्धामध्ये पराभव झाल्यामुळे माझा अपमान झाला आहे. त्यामुळेच माझे मन दुःखी आहे, खचलेले आहे. शेजारच्या राजाने माझ्याशी विश्वासघात केला आहे.'' यावर मोहिनीदेवी म्हणाली, ''राजन, एक गोष्ट लक्षात ठेवा. तुमच्या हातात हजारो प्रजाजनांचे जीवन आहे. राजा खचला म्हणजे राज्य बुडाले. तुम्ही ताकदीने उभे राहा. तंतूवाद्यामध्ये संगीत असते, जो प्रयत्नपूर्वक त्याच्या तारा छेडतो, त्याला संगीताचा आस्वाद घेता येतो. लाकडामध्ये अग्नी असतो, पण प्रयत्नपूर्वक प्रज्ज्वलित करणाऱ्यालाच त्याचा उपयोग होतो. गाय तिच्या पायाजवळ बसून जो प्रयत्नपूर्वक दूध काढतो त्यालाच दूध देते. तुम्ही जर प्रयत्न सोडून दिला, तर आयुष्याच्या कुठल्याही टप्प्यावर यश तुम्हाला मिळणार नाही. आपले राज्य संपून जाईल आणि लाखो प्रजाजन दुःखात बुडून जातील.''

पत्नीचे हे शब्द ऐकताच देवभूतीने बाजूला काढून ठेवलेल्या तलवारीच्या मुठीवर हात ठेवला. तलवार उचलली आणि 'अश्मक विजयी भव' अशी ललकारी दिली. राजवाड्यातून सैन्य बाहेर पडले आणि जितेंद्रिय राजाचे सगळे राज्य त्याने जिंकून घेतले.

गुड मॅनर्स

काळजीपूर्वक करा उपकरणांचा वापर

दोस्तांनो, टीव्ही-एसीचा रिमोट, मिक्सर, वॉशिंग-मशीन, फ्रीज, कंप्युटर, अशी कित्येक उपकरणे तुम्ही वापरत असाल. मात्र, त्यांचा वापर झाल्यावर तुम्ही ते नीट बंद करता का? वस्तू जागच्या जागी ठेवता का? त्या उपकरणांची नीट काळजी घेता का? यावर तुम्ही 'गुड बॉय/ गर्ल' आहात की, नाही? हे ठरतं.

तुम्ही जर आजूबाजूला पाहिलं, तर अनेक घरातील मुलांना अशी सवय असते की, टीव्ही वा एसीचा रिमोट वापरला की, तो तसाच सोफ्यावर किंवा खुर्चीवर ठेवून देतात. फ्रीज उघडलं की, त्याचे दार बंद करत नाहीत. खोलीतून बाहेर पडताना पंखा, दिवे सुरूच ठेवतात. मोठ्या माणसांचे पेन, डायरी वगैरे वापरली की ती पुन्हा जागेवर ठेवत नाहीत. अशा मुलांचं कौतुक कोणीही करत नाही. त्यांना घरातील वस्तू वापरायला फारशा दिल्या जात नाही. तुम्हाला अशी सवय असेल, तर ती तात्काळ बदला. कोणतीही गोष्ट वापरली की, ती पुन्हा त्याच जागेवर व्यवस्थित ठेवा. त्यामुळे ती लगेच सापडते आणि बिघाड होत नाही. ती जमिनीवर पडून फुटत नाही किंवा कशाच्या तरी मागे ठेवली गेल्याने आपली शोधाशोधही होत नाही.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, विजेच्या उपकरणांचा वापर नीट केला नाही, तर ती खराब होतात आणि बिलही खूप येतं. कोणीही खोलीत नसताना पंखा, दिवे सुरू आहेत, ए.सी. चालू आहे, मिक्सरचं बटण चालू आहे, वॉशिंग मशीन फिरून थांबलं, तरी त्याचं बटण सुरू आहे... अशा गोष्टी होत असतील, तर ते बंद करायला हवं. त्यामुळे वापर झाला की पंखा, दिवे बंद करा. याबरोबरच स्टेपलर, पिन, कात्री अशा छोट्या छोट्या वस्तूंचा वापर झाल्यावर ते जागच्या जागी नीट ठेवा. त्यामुळे तुमचा वेळ वाचेल आणि कोणी तुम्हाला ओरडणार नाही. करणार ना मग हे?

अवकाश

सदानंद होशिंग

ग्रहविचार

संस्कृतमध्ये एक श्लोक आहे.
ब्रह्मा मुरारी त्रिपुरांतकारी, भानू शशी भूमीसुतो बुधश्च/ गुरु शुक्र शनि राहु केतवः सर्वे ग्रहा मम शांतिकारकः//
या श्लोकात ग्रहांची नावे तर आली आहेतच, पण यातील विशेष म्हणजे मंगळ ग्रहाला भूमीसूत म्हणजे पृथ्वीचा पुत्र असे म्हटले आहे. चला तर आज जाणून घेऊया मंगळ ग्रहाविषयी.

मंगळ ग्रह हा रंगाने लालसर आहे. यावरील पृष्ठभाग पृथ्वीच्या पृष्ठभागासारखाच काहीसा आहे. मंगळावर सिलिकॉन, ऑक्सिजनयुक्त खनिजे, धातू आणि अन्य काही गोष्टींचा सामावेश आहे. याची घनता पृथ्वीपेक्षा कमी आहे. मंगळावरील तापमानात फार फरक आहे. थंडीच्या दिवसांत ते उणे ८७० पासून उणे ५० अंश सेल्सिअस, तर उन्हाळ्यात ते ३०० अंश सेल्सिअसपर्यंत जाते.

मंगळ हा सूर्यापासूनचा चौथा ग्रह आहे. मंगळाचे सूर्यापासूनचे अंतर २३ कोटी किलोमीटर आहे. तेथील दिवस हा पृथ्वीवरील दिवसापेक्षा काहीसा मोठा आहे. तो २४ तास आणि ४० मिनटे इतका आहे. या ग्रहाची निर्मिती साधारणपणे ४.५ अब्ज वर्षांपूर्वी झाली असे संशोधकांचे म्हणणे आहे. असे सांगण्यात येते, की सूर्याभोवती फिरणाऱ्या गॅस आणि धुळीच्या कण गुरुत्वाकर्षणाने हळू हळू एकत्र खेचले गेले आणि त्यातून मंगळ ग्रहाचा जन्म झाला.

मंगळाला दोन चंद्र (उपग्रह) आहेत. त्यांची नावे 'फोबोस' आणि 'डिमोज' अशी आहेत. मंगळाला इंग्रजीत 'मार्स' म्हणतात. मंगळाचा व्यास हा ६,३७० किलोमीटर इतका आहे. मानवाने ज्या ग्रहांचा मिशनद्वारे जास्त अभ्यास केला, त्यात मंगळ ग्रह आहे.

योग जीवन

मनाली देव

एकपाद वृक्षासनयुक्त वाशिष्ठासन

हे एक तोलात्मक आसन आहे. यापूर्वी आपण वाशिष्ठासन व वृक्षासन कसे करतात ते बघितलं आहे. या दोन्हीचे एकत्रीकरण म्हणजेच एकपाद वृक्षासनयुक्त वाशिष्ठासन.

असे करावे आसन

- प्रथम वाशिष्ठासनची स्थिती घ्यावी. म्हणजेच सूर्यनमस्कारच्या चौथ्या स्थितीतून (हस्तपादासन) आपल्याला एका बाजूला वळायचे आहे. आपण प्रथम डाव्या हातावर वळूया. जेणेकरून शरीराची डावी बाजू जमिनीच्या बाजूला व उजवी बाजू वरच्या दिशेला येईल.
- डाव्या हातावर व पावलावर संपूर्ण शरीराचा भार पेलला जाईल. आता उजव्या हाताच्या मदतीने उजवा पाय गुडघ्यात वाकवून डाव्या मांडीवर घ्यावा.
- उजव्या पावलाचा तळवा डाव्या मांडीवर येईल या पद्धतीने ठेवावा. वृक्षासनामध्ये ज्या पद्धतीने पाय ठेवतो त्याच पद्धतीने ठेवावा.
- पूर्ण आसनस्थितीमध्ये शरीर ताठ व तिरप्या अवस्थेमध्ये असणं आवश्यक आहे. उजवा हात वरच्या दिशेला असावा.
- श्वास संथ सुरू ठेवावा. छायाचित्राप्रमाणे आसन करण्याचा प्रयत्न करावा. जेवढा वेळ तुम्हाला आसनस्थितीमध्ये स्थिर राहता येईल, तेवढा वेळ राहावे.
- आसन सोडताना सावकाश सोडून अशी स्थिती दुसऱ्या बाजूनेसुद्धा करावी.

लाभ

- या आसनामध्ये हाताच्या स्नायूंची ताकद व पोटाची ताकद वाढण्यास मदत होते.
- आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. मन शांत होते.

काळजी :
- संधिवात, फ्रोजन शोल्डर असणाऱ्यांनी योग्य सल्ला घेऊन मगच हे आसन करावे.

वाचू आनंदे

अजिंक्य मी

बालपण संपून किशोरवय- अर्थात 'टीनएज' सुरू होते आणि 'आता मी मोठा झालोय/ मोठी झालीय,' ही जाणीव सारखी मनात डोकवायला लागते. आपण कल्पनांच्या जगात रमू लागतो. 'मी मोठेपणी हे करीन-ते करीन', 'या क्षेत्रात जाईन', 'मोठा पराक्रम गाजवीन, मग सगळे माझे कौतुक करतील', 'मी खूप खूप यशस्वी होईन', 'आई-बाबा अभिमानाने सगळ्यांना सांगतील असे मी काही तरी करून दाखवीन,'... किती मोठी स्वप्ने असतात ना आपली?... पण फक्त स्वप्ने रंगवून पुरत नाही. संकटांनी खचून जाऊनही चालत नाही. स्वप्ने पूर्ण करण्यासाठी सतत प्रयत्न करवे लागतात. हे प्रयत्न करताना मनाला जे प्रोत्साहन लागते, ते छान छान गोष्टींमधून मिळू शकते. अशा काही गोष्टींचा संग्रह म्हणजे प्रवीण दवणे यांनी लिहिलेले 'अजिंक्य मी' हे पुस्तक. या पुस्तकात ९ गोष्टी आहेत आणि त्या सर्व सोप्या भाषेतल्या आहेत. तुम्हाला त्या वाचताना अजिबात बोअर होणार नाही आणि पुढे वाचत रहावेसे वाटेल. हे पुस्तक तुम्ही नक्की मिळवून वाचा. त्यातील एका तरी नायक-नायिकेच्या उदाहरणातून तुम्हाला प्रेरणा मिळेलच.



टिटूचा पाठिराखा गोलू!

कार्टूनची सफर

अरविंद रेणापूरकर

भारतीय कार्टून मालिकांमध्ये कुटुंबव्यवस्थेवर आधारितही काही कार्टून्स आहेत. त्यात भाऊ-बहीण, आई-वडिल, आजी-आजोबा, या नात्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. 'टिटू' ही एक अशीच मालिका आहे. या मालिकेत छोटा टिटू आणि त्याचा मोठा भाऊ असलेला गोलू यांचे अतूट नाते दाखवण्यात आले आहे. लहान मुलांच्या खोडकरपणाचे दर्शन असलेली ही मालिका छान मनोरंजन करते. आपण यापूर्वी 'टिटू' या पात्राविषयी एकदा जाणून घेतले आहे. आज 'गोलू'विषयी बोलूया.

तुलनेने नवी मालिका

२०२० मध्ये 'पोगो' वाहिनीवर प्रदर्शित झालेली ही मालिका 'कॉस्मोस माया' यांनी निर्माण केली आहे. यात टिटूच्या खोड्या आणि साहसी स्वभाव बघायला मिळतो, तशीच गोलूची संरक्षक भूमिकाही बघायला मिळते. विविध स्वभाववैशिष्ट्यांमधून निर्माण होणाऱ्या विनोदाचा त्यात आनंद घेता येतो.



भाऊच नाही, मित्रही!

टिटूचा संरक्षक आणि मोठा भाऊ असलेला गोलू नेहमी त्याच्या मदतीसाठी तत्पर असतो. ते फक्त भाऊ नाहीत, तर मित्र- 'बडीज'सुद्धा आहेत. शाळेतदेखील गरज पडल्यास तो टिटूच्या चुका स्वतःवर घेण्यास मागेपुढे पाहत नाही. त्याचा कणखर आणि तडफदार स्वभाव दिसतोच, पण तो अतिशय दयाळू आणि प्रेमळ हृदयाचा आहे. त्यामुळेच गोलू हे या मालिकेतील एक लोकप्रिय पात्र झाले.

रंजक गोष्टी

'गोलू और टिटू का मील मिशन' या मालिकेची कथा पहा- एकदा टिटू आणि गोलू यांना पार्टीला जायचे असते, परंतु त्यांची परीक्षा असल्याने आई त्यांनी तिथे जाण्यास मनाई करते. परीक्षा टाळून पार्टीला जाण्यासाठी टिटू आपण कावळा झालोय असा बनाव करतो. खऱ्या कावळ्यासारखेच 'काव काव' करू लागतो. आईला ते खरे वाटते. ही बातमी सगळीकडे पसरते आणि शेजारी खाऊ घेऊन त्यांच्याकडे येतात. 'कावळे तर आपले पितर असतात, त्यामुळे त्यांना अन्न द्यायला आलो,' असे शेजारी सांगतात. शेजाऱ्यांनी आणलेला सगळा खाऊ टिटू खाऊन टाकतो. खऱ्याखुऱ्या कावळ्यांना त्यातले काहीच न मिळाल्याने ते टिटूला किडनॅप करून त्याच्याबरोबर एक करार करतात. टिटूने खोटा कावळा होऊन सगळ्यांकडून खाऊ वसूल करावा आणि कावळ्यांना द्यावा, असे ठरते. मग सर्व लोक त्याला कावळा समजून अन्न देऊ लागतात. मध्येच सायकलचोराला पकडण्याच्या प्रयत्नात टिटूचे पितळ उघडे पडते. मात्र गोलू कायम त्याला साथ देतो. गोलू पाठीशी असतो, म्हणूनच टिटूच्या खोड्या यशस्वी होतात.

ज्ञान-विज्ञान

डॉ. तन्मयी रानडे

मित्र-मैत्रिणींनो, तुम्ही विज्ञानाच्या पुस्तकात पेशी, ऊती अशा संज्ञांचा अभ्यास केला असेल, पण या सर्व पेशी 'मूळ पेशी' नावाच्या एका प्रकारापासून बनतात. त्यांना Stem cells अथवा मूळ पेशी असेही म्हणतात. या पेशींची अनेक वैशिष्ट्ये असतात. मात्र, त्यांची खरी जादू अशी आहे की, या पेशींना 'अमर पेशी' असेही म्हणतात. चला तर मग जाणून घेऊया, या पेशींची गंमत!

पेशी म्हणजे काय?

निर्मिती

कॅनडामधील अर्नेस्ट मॅककुलोच आणि जेम्स टिल या दोन संशोधकांनी मूळ पेशींची संकल्पना मांडली. आपल्या शरीरातील मूळ पेशींचे विभाजन होऊन नवीन पेशी बनतात. विभाजनच्या एका टप्प्यावर पेशींचे वर्गीकरण होते, म्हणजेच त्या भिन्न होतात. यानंतर त्यांचे गुणधर्म आणि कार्य मूळ पेशींपेक्षा वेगळे असते आणि मग या पेशी आपल्या शरीरातल्या एखाद्या अवयवाच्या ऊतीचा भाग बनतात. मग त्या विशिष्ट अवयवाचे कार्य करू लागतात. उदा. मूत्रपिंडाच्या पेशी मूत्र बनवण्याचे काम करतात किंवा पोटातल्या पेशी अन्नाचे अभिशोषण करण्याचे काम करतात, रक्तपेशी ऑक्सिजन वाहून नेतात, इत्यादी.

मूळ पेशी म्हणजे काय?

मूळ पेशी या अविभाजित पेशी असतात. त्यांच्यात विशिष्ट पेशी प्रकारांमध्ये विकसित होण्याची क्षमता असते. त्या आपल्या शरीरात एक बिघाड दुरुस्त करणारी प्रणाली म्हणून काम करतात आणि खराब झालेल्या ऊती पुन्हा निर्माण करण्याची क्षमता त्यांच्यात असते.

फरक

सामान्य पेशी विभाजित झालेल्या असतात आणि आपल्या शरीरात एक विशिष्ट कार्य करतात. मात्र, मूळ पेशी या अविभाजित असतात आणि त्या कुठलेही विशिष्ट कार्य करत नाहीत. मात्र, त्यांच्यात स्वतःचे नूतनीकरण करण्याची आणि विविध पेशी प्रकारांमध्ये विभाजित होण्याची क्षमता असते. सामान्य पेशी विभाजित होऊन एखाद्या विशिष्ट अवयवाच्या ऊतीमध्ये कार्यरत झाल्यावर, त्यांचे आयुष्य मर्यादित असते. मूळ पेशी या अमर आहेत असे मानले जाते, कारण त्यांच्यात स्वनूतनीकरण करण्याची क्षमता असते.

मूळ पेशी कुठे असतात?

आपल्या शरीरातील विविध ऊती आणि अवयवांमध्ये या पेशी असतात, पण मुख्यतः त्या अस्थिमज्जेत असतात. अस्थिमज्जा म्हणजे हाडांच्या आत असणारा मऊ, स्पंजसारख्या ऊती. त्या रक्तपेशी तयार करण्याचे काम करतात. त्यांना प्रौढ मूळ पेशी असे म्हणतात. माणसाच्या वयानुसार मूळ पेशींचे प्रमाण आणि कार्य करण्याची क्षमता कमी होत जाते. अस्थिमज्जेशिवाय गर्भाच्या शरीरातही या पेशी मोठ्या प्रमाणात असतात. त्यांना 'भ्रूण मूळ पेशी' असं म्हणतात.

उपयोग

विविध प्रकारच्या रोगांच्या उपचारासाठी या पेशींचा उपयोग होऊ शकतो. नवीन पेशींना जन्म देण्याच्या गुणधर्माचा उपयोग उपचारांसाठी होऊ शकतो.

उदा. रक्ताचा कर्करोग - कर्करोगाने ग्रस्त झालेल्या रक्तपेशींचा नायनाट औषधांच्या साह्याने झाल्यावर नवीन, निरोगी रक्तपेशी तयार करण्यासाठी मूळ पेशींचे रोपण केले जाते. अस्थिमज्जा किंवा नुकत्याच जन्माला आलेल्या बाळाची नाळ यांतूनही मूळ पेशी वेगळ्या करता येतात आणि नंतर प्रयोगशाळेत वाढवता येतात.

? १) कोणत्या पेशी अविभाजित असतात?

✓ ५) सी अँड स्काय हे ॲप समुद्र आणि आकाशाची माहिती देते.

खालील चित्रांतील अधिकाधिक फरक शोधा.



गणित सोडवा.



चित्र रंगवा

ठिपके जोडून चित्र पूर्ण करा.

मार्ग शोधा.



हस्त कला

मंदार वैद्य

कागदाचा हत्ती

दोस्तांनो, ओरिगामीच्या विविध कलाकृती कशा करायच्या? हे आपण या सदरातून शिकत आहोत. आतापर्यंत तुमच्यापैकी काही जणांना सफाईदारपणे ही कला जमू लागली असेल. मात्र, ज्यांना थोडं अवघड जातं आहे, त्यांनी सराव सुरू ठेवला तर नक्कीच जमेल. आपण आज कागदाचा हत्ती करून पाहणार आहोत. चला तर मग करूया सुरुवात...!

कृती १



चौरस कागद पतंगाप्रमाणे समोर धरा. त्याची उभी घडी घाला आणि उलगडा.

कृती २



उजव्या आणि डाव्या बाजूच्या कागदाच्या वरील कडा मध्य रेषेवर आणून घड्या घाला. कागद पलटून घ्या.

कृती ३

वरील टोक उचलून खालील टोकावर आणा व घडी घाला.

कृती ४

तुटक रेषेने दर्शवल्याप्रमाणे घडी घालण्यासाठी खालील टोक उचला व वर आणा. ही घडी वरील बाजूला समांतर असावी.

कृती ५

तुमच्या हातातील कागद असा दिसेल. तो आता पलटून घ्या.

कृती ६

खालील टोक उचलून निळ्या बाणाने दर्शवलेल्या ठिकाणी आणा व घडी घाला.

कृती ७



उभ्या मध्यरेषेवर घडी घाला व हातातील कलाकृती ९०° मध्ये डावीकडे फिरवा.

कृती ८



निळ्या बाणाने दर्शवलेली बाजू थोडी खाली ओढायची आहे. त्याचवेळी पांढऱ्या बाणाने दर्शवलेला भाग थोडा वरती येईल. ही घडी समजून घेण्यासाठी कृती क्रमांक नऊमधील आकृती पाहा.

कृती ९



तुटक रेषेने दर्शवलेली घडी आपल्या बाजूने खाली घ्यायची आहे.

कृती १०



तुटक रेषेने दर्शवलेली घडी आतल्या बाजूने वर घ्यायची आहे.

कृती ११



तयार झालेल्या कलाकृतीकडे बारकाईने पहा. यामध्ये तुम्हाला हत्तीचा आकार व्यवस्थित दिसेल.

कृती १२



सोंडेचा छोटासा भाग घडी घालून आतमध्ये सरकवा. कलाकृतीची लाल रेषेने दर्शवलेल्या बाजूचा आधार घेऊन तुम्ही तयार केलेल्या हत्तीला उभे करा. झाला आपला हत्ती तयार!

स्पर्धेत उतरताना

जयंत बोरसे

शैक्षणिक प्रगतीतील अडथळे

काही वेळा वैयक्तिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांना शाळा सोडावी लागते किंवा शाळेची व्यवस्था नसल्याने त्यांच्या शिक्षणात खंड पडतो. यासाठी योग्य दिशेने विचार केल्यास आणि मुलांना व त्यांच्या वयोगटाला अनुसरून योजनांचा लाभ मिळवून दिल्यास, विद्यार्थ्यांची अखंड शैक्षणिक प्रगती कायम ठेवता येते.

प्रसंग - ३

यंदाचा ऊसतोडणीचा हंगाम सुरू होणार होता. सालाबादाप्रमाणे कृष्णाचे आई-वडील इच्छा नसताना त्याला कामाच्या ठिकाणी नेणार होते. खरं तर त्याला जायचं नव्हतं, पण परिस्थितीपुढे सर्वांचा नाइलाज होता.

समस्या : दर वर्षी किमान चार महिने त्याची शाळा बुडत असते. कारण त्याच्याबरोबर घरी कोणीच नसतं. त्याच्या कुटुंबासह त्याच्या नात्यातील सर्वच माणसे कामावर जातात. गावात थांबावे, शाळेत जावे, तर राहायचे कोठे? त्याच्या दृष्टीने हा यक्षप्रश्न होता.

निरीक्षण व नोंदी
अभ्यासात चांगली गती असल्यामुळे वरच्या वर्गातली, बरीचशी उदाहरणे कृष्णा सहज सोडवत असे. तो एकपाठी होता. इंग्रजी असो, की मराठी, त्याच्या बोलीभाषेतील हेल काढत का असेना, पण तो अस्खलित बोलण्याच्या प्रयत्नात असे. तसेच त्याचे लेखनही छान होते, त्याचे आकलन आणि समज उत्तम होती.

तात्पुरता प्रयत्न : शिक्षक त्याला शाळेपासून लांब ठेवण्याच्या मन:स्थितीत नव्हते. शिक्षकांनी त्याला आपल्या स्वतःच्याच घरी ठेवून घेण्याचा निर्णय घेतला. त्याच्या पालकांना सांगितले. महिन्यातून एकदा किंवा सुट्टी मिळाल्यावर सवडीप्रमाणे पालकांच्या भेटीला पाठवू. पुन्हा त्याला नियमित शाळेसाठी पालकांनी आणून सोडायचं. असा तोडगा दोन्ही बाजूंनी मान्य झाला. कृष्णाला खूप आनंद झाला. सरांबरोबरच पालकांनाही समाधान वाटलं.

पुढील धोरणात्मक निर्णय : दर वर्षी सर त्याला आपल्याकडे ठेवू शकतीलच असं नाही. भविष्यात सरांची बदली झाली किंवा आणखी काही अडचणी आल्या, तर त्याच्या शैक्षणिक खंडाचे काय? यावर उपाय शोधणे आवश्यक होते. त्या दृष्टिकोनातून पाचवीचे हे वर्ष योग्य होते. म्हणून सरांनी 'आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा' या स्पर्धा परीक्षेचे अध्ययन-अध्यापनाचे नियोजन तयार केले. कृष्णाचा अभ्यास लगेच सुरू झाला.

प्रसंग - ४

अथर्वच्या कुटुंबाबरोबर आणखी आठ-दहा कुटुंबे दोनशे-अडीचशे मेढ्यांचा कळप घेऊन भटकंती करत असत. चारा-पाण्याची सोय होईल अशा ठिकाणी पालं टाकून राहत असत. तिथून जवळ असणाऱ्या गावातील, वस्तीतील शाळेत त्या कुटुंबातील मुलं जात किंवा कधी कधी घरीच खेळत असत.

समस्या : साधारणतः एकाच वयोगटातील ही मुले! कोणी तिसरी तर कोणी चौथी, पाचवीत होती. त्यांपैकी पाचवीत असणारा अथर्व व त्याचा जिवलग मित्र प्रवीण दोघेही व्यवहारकुशल व हुशार होते. परंतु, कौटुंबिक अडचणींमुळे बऱ्याचदा त्यांची शाळा बुडत असे. अलीकडे हे प्रमाण वाढत होते.

निरीक्षण व नोंदी : राहण्याच्या ठिकाणापासून शाळेचे जास्त अंतर, शाळेला येण्यासाठी करावी लागणारी आवरासावर किंवा निघण्यापूर्वी जेवणाची व्यवस्था न होणे, या आणि यांसारख्या काही बाबींमुळे ते शाळेत येऊ शकत नसत. जर ते पूर्ण वेळ शाळेत येऊ शकले असते, तर त्यांचा अभ्यास वाढून गुणवत्ता विकास झाला असता.

तात्पुरता प्रयत्न : सरांनी शाळा व्यवस्थापन समितीतील सभेत या मुलांविषयी चर्चा केली. गावातील काही व्यक्तींनी या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीतील अडथळे दूर करण्याच्या उद्देशाने दत्तक-पालक योजना राबवायचं ठरवलं. त्यांनी दिलेल्या आर्थिक व वस्तुरूप मदतीतून या मुलांची शाळेजवळील जागेत, रात्रीच्या जेवणाबरोबर राहण्याची सोय झाली.

पुढील धोरणात्मक निर्णय : भविष्यात चांगले शिक्षण घेऊन, प्रज्ञाविकास साधावा असा हेतू लक्षात ठेवला. त्यानंतर अथर्व आणि प्रवीणच्या जादाच्या अभ्यासासाठी वैयक्तिक मार्गदर्शनाचे तास सुरू करण्याचे नियोजन सरांनी केले. त्यांच्या शैक्षणिक प्रश्नांची कायमची सोडवणूक करण्यासाठी 'विमुक्त जाती व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा' या स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली.

• Registered • Date of Publication : शुक्रवार, ४ एप्रिल २०२५ • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७.



भूकंप : का? कसा? काय दक्षता घ्याल?

दोस्तांनो, शाळेत तुम्ही आपत्तीचे नैसर्गिक आणि मानवनिर्मित असे दोन प्रकार शिकला असाल. पूर, दुष्काळ, वादळ, भूकंप यांसारख्या संकटांना नैसर्गिक आपत्ती असं म्हटलं जातं. निसर्गाचा समतोल बिघडला, काही तीव्र बदल झाले, मानवाचं अतिक्रमण वाढू लागलं, की नैसर्गिक आपत्ती येण्याचे धोके वाढतात. म्यानमार आणि थायलंडला नुकताच भूकंपाचा मोठा धक्का बसला. तिथे मोठ्या प्रमाणावर जीवितहानी आणि वित्तहानीसुद्धा झाली. जगभरातून तिथे मदत पाठवली जाते आहे, भारतानेदेखील मदतीचा हात पुढे केला आहे. मात्र, भूकंप कसा होतो? त्याचं प्रमाण कसं मोजतात? याबद्दल आपण जाणून घेऊया!

जगातील मोठे भूकंप

९.५ (आकडे रिश्टर स्केलमध्ये)
आतापर्यंतचा सर्वात मोठा भूकंप चिली येथे २२ मे १९६० रोजी आला होता. रिश्टरस्केलवर या भूकंपाची तीव्रता ९.५ एवढी नोंदवली गेली होती. या भूकंपात सुमारे १६५५ लोकांचा मृत्यू झाला होता.

९.२
दुसरा सर्वात मोठा भूकंप अमेरिकेतील अलास्का येथे झाला होता. त्याची तीव्रता ९.२ रिश्टर स्केल होती. २७ मार्च १९६४ रोजी झालेल्या भूकंपाचे धक्के सतत ३ मिनिटे जाणवले.

९.१
तिसरा मोठा भूकंप सुमात्रा व अंदमान बेटांवर झाला, त्याची तीव्रता ९.१ रिश्टर स्केल होती. २६ डिसेंबर २००४ ला झालेल्या या भूकंपाचे धक्के भारत, श्रीलंका, थायलंडसह दक्षिण पूर्व आशियातील १० देशांमध्ये जाणवले. भूकंपानंतर आलेल्या त्सुनामीत ३ लाख लोकांचा मृत्यू झाला होता.

९.१
जपानमधील तोहोकू इथे ११ मार्च २०११ ला ९.१ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला आणि त्यामुळेही त्सुनामी आली. या आपत्तीत १५,७०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आणि ४६०० हून अधिक लोक बेपत्ता झाले.

८.८
मौले, चिली येथे २०१० ला झालेल्या भूकंपाची तीव्रता ८.८ रिश्टर स्केल होती. त्यामध्ये ५०० हून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला होता.

म्यानमार, थायलंड हादरले

७.७
म्यानमार आणि थायलंडला २८ मार्चला भूकंपाचे तीव्र धक्के बसले. ७.७ रिश्टर तीव्रतेच्या भूकंपाचे धक्के तिथे जाणवले. म्यानमार सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार आतापर्यंत देशभरात १७०० लोकांचा मृत्यू झाला असून, सुमारे ३४०८ लोक जखमी झाले आहेत. भूकंपाच्या केंद्रापासून सर्वात जवळ असलेल्या मंडाले शहरात ६९४ लोकांचा मृत्यू झाला. थायलंडच्या राजधानीत, बँकॉकमध्येही भूकंपाचे धक्के तीव्रतेने जाणवले. तिथल्या अनेक इमारती मोकळ्या केल्या गेल्या आहेत.

भारताला जाणवले धक्के

म्यानमारमध्ये झालेल्या भूकंपाचे हादरे भारतालाही जाणवले. कोलकाता, इंफाळ आणि मेघालयमधील पूर्व गारो हिल्स भागात सौम्य धक्के बसल्याचे स्थानिकांनी सांगितले. मात्र, यामुळे कोणतेही नुकसान झाले नाही. भारताप्रमाणेच चीनमधील युनान आणि बांगलादेशमधील काही भागालाही धक्के जाणवले.

भारताने केली मदत

- म्यानमारमधील भूकंपानंतर भारताकडून 'ऑपरेशन ब्रह्मा' याअंतर्गत मदत पाठवली जात आहे.
- भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या माहितीनुसार, ११८ सदस्य असलेलं भारतीय लष्कराचं फील्ड हॉस्पिटल युनिट आग्र्याहून मंडालेला रवाना झालं. हे पथक म्यानमारमधील लोकांना प्रथमोपचार आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा देत आहे.
- भारतीय हवाई दलाच्या सी-१३० विमानाने ब्लँकेट, ताडपत्र्या, स्वच्छता किट, स्लिपिंग बॅग, सौरदिवे, अन्नाची पाकिटं आणि किचन सेट म्यानमारला पाठवण्यात आले.

भूकंप म्हणजे काय?

- भूगर्भातील हालचालींमुळे प्रचंड प्रमाणात ऊर्जा तयार होऊन तिचं उत्सर्जन होतं आणि त्यामुळे 'भूकंप लहरी' तयार होतात. त्यामुळे पृथ्वीच्या पृष्ठभागाची हालचाल होते. त्यामुळे जमीन थरथरणे, हलणे, जमिनीला भेगा पडणे, कंपन होणे, भूकवच अचानक हादरणे असे प्रकार घडतात. त्यालाच 'भूकंप' असं म्हणतात.
- भूकंपामुळे भूपृष्ठाचा भाग मागे-पुढे किंवा वर-खाली होतो. जमिनीखाली असलेल्या भूकंपाच्या उगमस्थानास 'भूकंपनाभी' म्हणतात.
- भूकंपनाभीच्या अगदी वर, भूपृष्ठावर असलेल्या बिंदूस भूकंपाचा केंद्रबिंदू म्हणतात.
- तीव्र स्वरूपाचे हादरे सर्वप्रथम या केंद्रालगत येऊन पोहोचतात. त्यामुळे तिथे हानीचे प्रमाण सर्वात जास्त असते. भूकंपालेख यंत्रांवर धक्क्यांची नोंद आपोआप होत राहते.

भूकंपाची मोजणी

- भूकंपाची नोंद घेणाऱ्या यंत्रास 'सेस्मोग्राफ' अथवा 'सेस्मोमीटर' असे नाव आहे. तसेच, भूकंप मोजण्यासाठी 'रिश्टर स्केल' या एककाचा वापर केला जातो.
- ३ रिश्टर स्केल किंवा त्यापेक्षा कमी तीव्रतेचे भूकंप जास्त धोकादायक नसतात. ७ किंवा त्यापेक्षा जास्त तीव्रतेचे भूकंप प्रचंड मोठ्या प्रमाणात हानी करू शकतात.
- भूकंपाचे उगमस्थान जमिनीच्या खाली जितके जवळ, तितके नुकसानाचे प्रमाणही जास्त. भूकंपाचा केंद्रबिंदू वाळवंटात असेल, तर नुकसान होण्याची शक्यता अगदी कमी असते.
- भूगर्भाचा अभ्यास करणाऱ्या काही तज्ज्ञांच्या मते जगभरात दरवर्षी सुमारे ३० लाख भूकंप होतात. मात्र ते आपल्या सहजासहजी लक्षात येत नाही.

भूकंपाची कारणे

- नैसर्गिकरीत्या भूकंप होण्याची दोन प्रमुख कारणे आहेत. पृथ्वीवर ज्या ठिकाणी मुळातच भूकवचावर भेगा आहेत आणि अशा भेगांखालचे खडकांचे थर किंवा शिलाखंड एकमेकांवर घसरल्याने होणाऱ्या अकस्मात हालचाली हे भूकंपाचे पहिले कारण आहे. तसेच, ज्वालामुखीच्या उद्रेकामुळेदेखील भूकंप घडतात.
- अणुचाचण्या, खाणकामासाठी घडवले जाणारे कृत्रिम स्फोट, समुद्रात भर घालून किंवा टेकड्यांवर केलेले बेकायदा बांधकाम ही मानवनिर्मित कारणे आहेत.

दक्षता

- भूकंपसदृश हालचालींची जाणीव होताच क्षणाचाही विलंब न करता घरातून बाहेर पडा व मोकळ्या जागेत किंवा मैदानात जा.
- घरातील वृद्ध, अपंग, लहान मुले यांना मोकळ्या मैदानात नेण्याचा प्रयत्न करा.
- या काळात घरातील विजेची उपकरणे बंद करून ठेवा.
- आसपासची उंच झाडे, इमारती, विजेच्या तारा व खांब यांना स्पर्श करू नका.
- डोंगराळ किंवा उंच परिसरात तुम्ही असाल, तर उंचावरून घरंगळत येणाऱ्या दगडांपासून सावध राहा.